भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2016 ◐ AE 145727

20 FEB 2017

अनु.क्र. 106299 दि. .... मु.शु.रक्कम 500/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन ....

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव अथर्व कन्सोर्टियम ॲ रियल्टी प्रा. ली

पत्ता कॅम्प पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव ....

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता सदाशिव शिंदे

किरण देवराम लडकत
परवाना क्र. २२०११२५
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही जि.प. अंडर ग्राऊंड, मंगळधार पेठ, पुणे-११

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे
17 FEB 2017
प्रधान मुद्रांक निरीक्षक कार्यालय पुणे

NOTARY
A. RASHID D. SAYED
PUNE
REGD. No. 679/1994
Expiry Date 12/1/2018
STATE OF MAHARASHTRA

पाणी हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक २०/०२/२०१७ इसवी ते दिवशी.

मी अथर्व कन्सोर्टीयम ॲण्ड रियालिटी प्रा. लि. तर्फे श्री. अंकुश विजयकुमार मेहता, वय – ४१ वर्षे, धंदा –व्यवसाय, राहणार – ३२६, एम.जी.रोड, अशोक विजय कॉम्प्लेक्स, कॅम्प, पुणे – ४११००१

१) मौजे – हिंजेवडी, तालुका – मुळशी जिल्हा – पुणे येथील सर्व्हे नंबर १८ हिस्सा नंबर ४ क्षेत्र २,८००.०० चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी/बिगरनिवासी पध्दतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक/कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी दाखल केला आहे. तूर्त या जागी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे** कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टॅंकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत व त्यासंबंधी आवश्यक त्या वरीष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भुजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी/बिगर निवासी वापरासाठी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे** पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था या नात्याने इमारतींमधील रहिवाशांना मी करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी या हमीपत्राद्वारे स्विकारत आहे.

३) **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे** मार्फत कोणताही पाणी पुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे बुकींग करताना येणा–या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठयाची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती वरील बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुध्दा या ठिकाणी होणा–या बुकींगनंतर होणा–या नियोजीत गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे** चा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत माझ्या/आमच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करून देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील. **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे** ला तोशीष लागू देणार नाही.

५) टॅंकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणा–या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी काळजी घेईन.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक/प्रवर्तकास या

हमीपत्रातील सर्व बाबींतील लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेईन.

७) हे हमीपत्र माझे/आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर फ्लॅटमधील संदर्भातील कोणत्याही होणा—या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी राजीखुशीने दि.२०/०२/२०१७ रोजी लिहून दिले असे.

ठिकाण : पुणे
दिनांक : २०/०२/२०१७

हमीपत्र लिहून देणार
अथर्व कन्सोर्टीयम ॲण्ड रियालिटी प्रा.लि. तर्फे,
श्री. अंकुश विजयकुमार मेहता

NOTARY
A. RASHID
D. SAYED
PUNE
REGD. No. 679/1994
Expiry Date 12/1/2018
STATE OF MAHARASHTRA

BEFORE ME
A. RASHID D. SAYED
NOTARY STATE OF MAHARASHTRA
PUNE

20 FEB 2017

Noted & Registered
At.Sr.No. 5195/2017

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL